क्र.का.१२/मु.प./परि./ऑनलाईन परतावा/ ७१७४
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत,
पुणे ४११ ००१
दि. ३ /१/२०१४

**विषय :- मुद्रांक शुल्क परतावा अर्जाबाबत ऑन लाईन पदधतीने करावयाची कार्यवाही.**

**परिपत्रक**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम १०(३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मुद्रांकाद्वारे किंवा रोखीने मुद्रांक शुल्काची रक्कम शासनास अदा करणेत आली असेल किंवा लेखनप्रमादामुळे मुद्रांक खराब झाला असेल किंवा न्यायिकेत्तर ऐवजी न्यायिक मुद्रांक खरेदी केले असतील अशा मुद्रांकाचा परतावा देणेबाबत मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ४७ ते ५२ मध्ये तरतुद करणेत आली आहे.

या विभागाकडे न्यायिक आणि न्यायिकेत्तर या दोन्ही प्रकारच्या मुद्रांकाचा परतावा मिळण्याकरीता प्रकरणे दाखल केली जातात. न्यायिक मुद्रांकाचा परतावा देण्याचे अधिकार मुद्रांक जिल्हाधिकारी यांना आहेत तर मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ५२ ब मध्ये न्यायिकेत्तर मुद्रांकाचा परतावा देण्याचे अधिकार विषद करणेत आले आहेत.

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे प्रकरण ५ अन्वये देय परताव्याबाबत परतावा अर्ज संबंधित कार्यक्षेत्रातील मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केल्यानंतर मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडून परतावा प्रकरणावर कार्यवाही करणेत येते.

नोंदणी व मुद्रांक विभागाने, मागील काही वर्षापासून जनतेशी संबंधित प्रत्येक कामकाजामध्ये, अद्ययावत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन उक्त कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. याचाच एक भाग म्हणून मुद्रांक परतावा प्रणाली विकसित करण्यात आली आहे आणि त्याचा वापर सुरु करण्यात येत आहे.

या संदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. सदर आज्ञावली मुद्रांक व नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून सदर संगणकीय आज्ञावलीद्वारे नागरीकांनी परतावा अर्ज (online Refund Application) करताना वापरावयाची पध्दत पुढीलप्रमाणे राहील.

२. **ऑनलाईन परतावा अर्ज करावयाची कार्यपध्दती :-**

परतावा प्रकरण Online दाखल करणेसाठी नागरीकांनी www.igrmaharashtra.gov.in या संकेत स्थळावर जाऊन Refund Application या पर्यायावर click करावे. त्यानंतर प्रथम संगणक स्क्रिनवर खालीलप्रमाणे चार पर्याय असतील.

**१) Home Page २) Refund Application ३) View Status ४) Help**

## २.१ Home Page (मुख्य पृष्ठ):-

## २.२ Refund Application (परतावा प्रणाली ) :-

उक्त पर्यायावर क्लीक केल्यानंतर संगणक स्क्रिनवर खालील पर्याय उपलब्ध होतील. या पर्यायाचा वापर करुन Refund Application संबंधी माहिती अर्जदाराने काळजीपूर्वक भरावी.

### २.२.१ Party details (पक्षकाराचा तपशिल) :-

यामध्ये अर्जदाराने स्वतःची माहिती भरावी जसे नांव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आय.डी., बँक खाते क्रमांक, बँकेचे नांव कोड क्रमांक व परतावा मागणीचे कारण नमूद करावे.

### २.२.२ Document details (दस्तऐवजाचा तपशिल) :-

यामध्ये दस्तऐवजासंबंधीची माहिती भरावी. दस्तऐवज निष्पादीत आहे/नाही, दस्तांचा प्रकार, दस्तऐवज नोंदणीकृत असल्यास क्रमांक, दिनांक व दुय्यम निबंधक कार्यालयाचे नांव तसेच रद्दपत्र नोंदणीकृत असल्यास त्याचा नोंदणी क्रमांक, दिनांक व दुय्यम निबंधक कार्यालयाचे नांव नमूद करावे.

### २.२.३ Stamp details (मुद्रांकाचा तपशिल) :-

यामध्ये मुद्रांकाचा प्रकार, मुद्रांक विक्रेत्याचे नांव व पत्ता, मुद्रांक खरेदीदाराचे नांव, मुद्रांक खरेदीचा दिनांक, क्रमांक व रक्कम, मुद्रांक ज्या जिल्हयातून खरेदी केले आहेत असा जिल्हा select करावा.

### २.२.४ Submit & Add more stamp details (एकापेक्षा अधिक मुद्रांकासंबंधी अधिक माहिती) :-

मुद्रांकाचे नग एकापेक्षा जास्त असल्यास "Submit & Add more stamp details " वर click करावे. त्यानंतर पुन्हा "stamp details," हा पर्याय येईल. मुद्रांकाच्या नगाची माहिती भरावी. मुद्रांकाची पूर्ण माहिती भरल्यानंतर लाल रंगामध्ये Image Code असेल तो त्यांच्या खाली असलेल्या रिकाम्या चौकटीत नमूद करुन Register Button वर click करुन आपला परतावा अर्ज सादर करावा.

### २.२.५ Acknowledgement (पोच पावती ) :-

परतावा अर्ज यशस्वीरित्या online दाखल झाल्यानंतर Acknowledgement (पावती) हा पर्याय दिसेल त्यात Refund token/code No. लाल रंगात दिसेल. सदर Refund token/code No. ची नोंद स्वतःकडे करुन घ्यावी किंवा प्रिंट काढून घ्यावी. सदर Refund token/code No मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष दाखल करावयाच्या अर्जावर नमूद करुन प्रत्यक्ष अर्ज विहित मुदतीत मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

## २.३ View Status (प्रकरणाची सद्यःस्थिती) :-

परतावा अर्जाची (प्रकरणाची) सद्यःस्थिती पाहण्यासाठी अर्जदाराने प्राप्त Refund Code क्रमांक नमूद केल्यानंतर Image code स्क्रिनवर दिसेल हा कोड त्याच्या खालील चौकटीत नमूद करुन Search या ठिकाणी click करावे म्हणजे परतावा अर्जदारास परतावा प्रकरणांची सद्यःस्थिती अद्ययावत स्वरुपात मिळेल.

२.४ **Help (मदत):-**

या पर्यायामध्ये प्रकरणासोबत सादर करणेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी आहे. सदर यादीतून प्रकरण निहाय आवश्यक कागदपत्रे निवडून प्रकरणासोबत जोडावीत. त्यानंतर परतावा अर्जावर Refund code नमूद करुन मुळ कागदपत्रे (original document) व परतावा अर्ज प्रत्यक्षरित्या (submission of physical document) संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात विहित मुदतीत दाखल करावा.

२.५ **नागरीकांना महत्वाची सूचना :-**

मुदतबाह्य परतावा प्रकरणे संगणक प्रणाली स्विकृत करणार नाही. तसेच online Refund application हे कार्यालयीन वेळेतच दाखल करणे बंधनकारक राहील. केवळ ऑनलाईन अर्ज करणे पुरेसे नसून मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित मुद्रांकासह प्रत्यक्ष अर्ज ऑनलाईन Refund code नमूद करुन दाखल करणे आवश्यक आहे. परतावा प्रकरण मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्षरित्या ज्या दिनांकास दाखल केले जाईल तो दिनांक परतावा प्रकरणांचा दाखल दिनांक असेल. त्या दिनांकानुसार कलम ४४, ४८ मधील मुदतीबाबत कालगणना केली जाईल.

दि.१०/०१/२०१४ पासून **Online Refund Application** चा वापर बंधनकारक करणेत येत असून वरील सूचनांचे पालन सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्राक जिल्हाधिकारी, अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई व सर्व मुद्रांक उपनियंत्रक यांनी काटेकोरपणे करुन Refund Application ची यशस्वी अंमलबजावणी करावी.

सही/- (एस.चोक्कलिंगम् )
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई

२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर

३) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व सर्व सह जिल्हा निबंधक ,

४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

निर्गमित

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**